R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक

E-mail:dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ९

दि. १६ डिसेंबर २०२५, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# महावृत्त

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## 'उमेद'च्या ग्रामीण महिलांचा देशाच्या राजधानीत झेंडा !

नवी दिल्ली, : देशाच्या राजधानीत गेले तीन दिवस आयोजित महाराष्ट्र खाद्य महोत्सव २०२५ च्या निमित्ताने महाराष्ट्राच्या वैशिष्ट्यपूर्ण खाद्य संस्कृतीचा खमंग दरवळ दिल्लीकरांना मोहित करुन गेला. केवळ खाद्यपदार्थांच्या सादरीकरणापुरता हा महोत्सव मर्यादित राहिला नाही, त्यासोबतच संस्कृतीच्या विविध आविष्कारांचे दर्शन झाले आणि ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाला राष्ट्रीय स्तरावरही व्यासपीठ मिळाले. दिल्लीकरांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभलेल्या या महोत्सवाचा नुकताच समारोप झाला.



कस्तुरबा गांधी मार्गावरील नवीन महाराष्ट्र सदनाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाचे उद्घाटन शेफ विष्णू मनोहर यांच्या हस्ते करण्यात आले होते. तीन दिवस सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत दिल्लीच्या थंड हवेत महाराष्ट्राच्या मातीचे दरवळणारे खमंग सुगंध आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा उत्साह लक्षणीय होता. महोत्सवात कोकणातील मालवणी सीफूड, कोल्हापूरचा तिखट तांबडा-पांढरा रस्सा, विदर्भातील झणझणीत सावजी मटण रस्सा, कोल्हापूरची मिसळ, खिमा पाव, खानदेशातील खापरावरची पुरणपोळी, वांग्याचे भरीत, गोळा भात, सांभार वडी, उकडीचे मोदक आणि शेव भाजी यांसारख्या पदार्थांनी मोठी गर्दी खेचली.

या उत्सवाचे खरे वैभव ठरले ते महाराष्ट्रातील आठ जिल्ह्यांतील 'उमेद' योजनेअंतर्गत कार्यरत महिला स्वयंसहाय्यता गटांचा सहभाग. अमरावती, जळगाव, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, ठाणे, बीड आणि नागपूर येथील प्रशिक्षित महिलांनी आपले घरगुती आणि पारंपरिक पदार्थ राष्ट्रीय स्तरावर सादर करून ओळख मिळवली. यावेळी, महिलांनी निवासी आयुक्त आर. विमला यांनी आपल्याला ही संधी उपलब्ध करून दिली, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले आणि 'यामुळे आमच्या ग्रामीण स्वप्नांना पंख मिळाले' अशी भावना व्यक्त केली.

समारोप समारंभात मार्गदर्शन करताना निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्राच्या अधिकारी व कर्मचारी आणि 'उमेद'च्या महिलांचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, हा महोत्सव केवळ खाद्यपदार्थांचा उत्सव नव्हता, तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा आणि ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाचा प्रेरणादायी संगम ठरला आहे. या यशात 'उमेद'चा भक्कम पाठिंबा आणि निलेश सागर व त्यांच्या टीमचे मोठे योगदान आहे. त्यांनी सर्व जिल्ह्यांच्या अधिकारी आणि संबंधित टीमने दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या यशस्वी आयोजनाच्या समारोपावेळी, निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांच्या हस्ते सर्व सहभागी महिला बचत गटांच्या सदस्यांचा खास भेट देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, महाराष्ट्र परिचय केंद्राच्या जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, व्यवस्थापक प्रमोद कोळपते, उपअभियंता किरण चौधरी, आशुतोष द्विवेदी आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांच्यासह खासदार बळवंत वानखडे, अमर काळे, धैर्यशील मोहिते पाटील, प्रशांत पडोळे, नरेश मस्के, शिवाजीराव कालगे, भास्करराव भगरे व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी महोत्सवाला भेट देऊन प्रशंसा केली. उत्कृष्ट व्यवस्थापन आणि सुविधांमुळे हा उत्सव कुटुंबीयांसाठी अविस्मरणीय ठरला.

## एक कोटी रुपयांच्या विम्यासाठी व्यक्तीची हत्या करून आत्महत्येचा बनाव

### लातूर पोलिसांची २४ तासांत आरोपीला अटक; संयुक्त पथकाची भरीव कामगिरी




लातूर :- एक कोटी रुपयांचा विमा दावा मिळवण्यासाठी एका व्यक्तीचा खून करून अपघाती मृत्यू अथवा आत्महत्येचा बनाव केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, लातूर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत आरोपीला अटक करून गुन्हा उघडकीस आणला आहे. ही ारवाई औसा पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने केली.

या प्रकरणी गणेश गोपीनाथ चव्हाण (रा. विठ्ठल नगर, औसा) यास अटक करण्यात आली सून, त्याच्याविरोधात औसा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५२१/२०२५ कलम १०३(१), २३८ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल आहे.

दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे १० वाजता आरोपीने आपल्या साथीदार गोविंद किशन यादव (वय ५०, रा. पाटील गल्ली, औसा) यास कारमधून निर्जनस्थळी नेले. आधी त्यांना चिकन खाण्यास देऊन, त्यानंतर वानवडा पाटी ते वानवडा जाणाऱ्या रस्त्यावर गळा आवळून खून केला. मृतदेह शेतात टाकून देत आरोपीने वाहनाला आग लावून अपघाताचा बनाव केला.

दि. १४ डिसेंबर रोजी रात्री १२.३० वाजता डायल ११२ वर वाहनाला आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर औसा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. जळालेल्या वाहनात मानवी हाडांचा सांगाडा आढळून आल्याने अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू करण्यात आला. तांत्रिक विश्लेषण, वाहन क्रमांक, साक्षीदारांचे जबाब व इतर पुराव्यांच्या आधारे आरोपीवर संशय बळावला. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. आर्थिक अडचणीत असल्याने व विम्याची रक्कम मिळवण्यासाठी त्याने हा खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

तपास पथक ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक मा. श्री. अनमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. कुमार चौधरी, औसा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रेवणनाथ डमाळे, पोलीस उपनिरीक्षक अतुल डाके, पोलीस उपनिरीक्षक भास्करसिंह मालवडकर यांच्या नेतृत्वाखालील पथकात पोलीस अमलदार अर्जुन राजपूत, महादेव विलायते, युवराज गिरी, तुराब पठाण, रामलिंग शिंदे, नवनाथ हासवे, संजय जगताप, राजेश कंचे, श्रीनिवास जांभळे, तसेच मोतिराम धुळे, रामकिशन गुट्टे, मुराज सरप, हनमंत पाटील, दिनेश गवळी, अशोक राठोड, रतन शेख, शेणकर, महेश मुळे, बालाजी चव्हाण, भरत भुरे, महेश हिंसरागर, सोमनाथ खडके, बालिका सरवडे, सदाशिव दंतुरे, सचिन मंडळे, भागवत गोमारे, सूर्यकांत मगर, गोविंद पाटील, आणि सायबर पोलीस स्टेशनचे शैलेश सुडे व मपो. अंजली गायवाड यांनी विशेष मेहनत घेतली.

लातूर पोलिसांच्या या जलद व चूक कारवाईमुळे गंभीर स्वरूपाचा गुन्हा ल्पावधीत उघडकीस आला असून, ागरिकांतून पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

## मेट्रोच्या माध्यमातून कोंढवा परिसर इतर भागाशी जोडणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुणे: कात्रज-कोंढवा मार्गाचे काम लवकरात पूर्ण करण्यात येईल, मेट्रोच्या माध्यमातून कोंढव्याचा भाग इतर भागाशी जोडण्यात येईल. शिवाजी नगर ते येवलेवाडी मेट्रोमार्गाला मान्यता, स्वारगेट ते कात्रज मेट्रोमार्ग कोंढव्यापर्यंत आणणे आणि पुरंदर विमानतळाशी जोडणारी प्रस्तावित मेट्रोच्या माध्यमातून या भागाला जोडण्यात येईल,असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



श्री भैरवनाथ ग्रामविकास मंडळाच्यावतीने कोंढवा बु. येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार योगेश टिळेकर, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, चेतन तुपे, मंडळाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी महाराष्ट्राला स्वाभिमान शिकवला असे नमूद करून श्री. फडणवीस म्हणाले, ते एक दृष्टे नेते, राज्यकर्ते होते त्यांनी समतेचे राज्य निर्माण केले. स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करणाऱ्यांना कठोरातले कठोर शिक्षा करणारे त्यांचे शासन होते. त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली कोंढव्याची भूमी आहे, या भूमीवर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण होत असल्याचा आनंद होत आहे. पुतळ्यामुळे कोंढवा बु. परिसरासह संपूर्ण महाराष्ट्राचे वैभव वाढले आहे.

ज्या काळात मोगलशाही, नीजामशाही, आदिलशाही असे परकीय आक्रमक मराठीभूमी, हिंदुस्थानावर आक्रमण करीत होते, त्यावेळी अनेक राजे आणि राजवाडे मुघलांचे मंडलिक म्हणून आधिपत्य स्वीकारत होते. अशा काळामध्ये जिजाऊ मासाहेबांच्या आशीर्वादाने छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य निर्माण करण्याची शपथ घेतली. अठरापगड जातीच्या नागरिकांना एकत्र करून, त्यांच्यामध्ये विजिगीषुवृत्तीचे रोपण करुन त्यांच्यामाध्यमातून हिंदवी स्वराज्य स्थापन केले. त्यानंतर छत्रपती संभाजी महाराजांनी मुघलांशी लढाई करुन स्वराज्याचे रक्षण केले. त्यानंतर ताराराणींनी झुंज कायम ठेवत मराठ्यांनी दिल्लीचे तख्तही काबीज केले. अटकेपार झेंडाही मराठ्यांनीच लावला. आम्हाला स्वाभिमान देणारे, महाराष्ट्राचा अभिमान असणारे शिवाजी महाराजांचा सिबीएससीच्या अभ्यासक्रमात २१ पानांचा जाज्वल इतिहासाचा समावेश केला आहे, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

श्री. टिळेकर म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत अश्वारुढ पुतळ्याच्या लोकार्पण झाले. राज्य शासनाच्या माध्यमातून कोंढवा परिसराचा पायाभूत विकास करण्यात येत आहे.

## मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची रेणापूर येथे आज भाजपाच्या प्रचारार्थ जाहीर सभा

लातूर- रेणापूर नगरपंचायत निवडणुकीतील भारतीय जनता पार्टीच्या प्रचारार्थ राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मंगळवार दि १६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

रेणापूर नगरपंचायत निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या वतीने नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती शोभा शामराव आकनगिरे आणि सर्वच प्रभागातील १७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या उमेदवाराच्या निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने मंगळवार दि १६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता जाहीर सभा आयोजित करण्यात आली असून महायुती शासनातील राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

जाहीर सभेच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड हे राहणार आहेत तर याप्रसंगी भाजपाचे जिल्हाध्यक्ष माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर, माजी मंत्री आ. संजय बनसोडे, माजी आमदार अँड त्र्यंबकनाना भिसे यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.



रेणापूर नगरपंचायतीच्या पहिल्या निवडणुकीत भाजपाचा झेंडा फडकला. भाजपाच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात कोट्यावधी रुपये खर्चाची अनेक विकास कामे झाली असून झालेल्या विकास कामाच्या आधारावर भारतीय जनता पार्टी निवडणुकीला सामोरे जात आहे. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जाहीर सभेस रेणापूर नगरपंचायत कार्यक्षेत्रातील भाजपाच्या सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह मतदार बंधू भगिनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन रेणापूर शहर भाजपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## आचारसंहितेमुळे शास्ती माफी योजना रद्द

लातूर :- लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने लागू झालेल्या आदर्श आचारसंहितेमुळे कर सवलत योजनांबाबत सुधारित निर्णय घेण्यात आला आहे. आचारसंहिता लागू झाल्याने कर संकलन विभागाची ७० टक्के शास्ती माफी योजना तत्काळ प्रभावीपणे रद्द करण्यात येत असल्याची माहिती महानगरपालिकेने दिली आहे.,त्याचप्रमाणे मालमत्ता कर विभागाकडून देण्यात आलेली व्याज सुटीची मुदतवाढही रद्द करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोणत्याही स्वरूपाच्या सवलत किंवा शिथिलतेचे आदेश लागू राहणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. महानगरपालिका निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने नागरिकांना थेट लाभ देणाऱ्या किंवा कर सवलतीच्या योजना सुरू ठेवता येत नसल्याने हा निर्णय घ्यावा लागल्याचे प्रशासनाने सांगितले. त्यामुळे नागरिकांनी कर भरण्याबाबत सध्या लागू असलेल्या मूळ दरानुसारच भरणा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आणि आचारसंहिता उठल्यानंतर कर सवलतींबाबत नव्याने निर्णय घेण्यात येईल, अशी शक्यताही प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, नागरिकांनी कोणत्याही गैरसमजाला बळी न पडता महानगरपालिकेच्या अधिकृत सूचनांनुसारच कर भरणा करावा, असेही कळविण्यात आले आहे.




## संपादकीय...

# संसदेचे हिवाळी अधिवेशन

कायदे, संस्था आणि लोकशाहीची कसोटी संसदेचे हिवाळी अधिवेशन हे लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाचे पर्व मानले जाते. या अधिवेशनात जनतेच्या प्रश्नांवर चर्चा होणे, धोरणात्मक निर्णय घेणे आणि देशाच्या भवितव्यावर परिणाम करणारे कायदे पारित करणे, ही संसदची मूलभूत जबाबदारी आहे. यंदाच्या अधिवेशनात सरकारने अनेक विधेयके पारित करून आपली कार्यक्षमता दाखवली, मात्र त्याचबरोबर प्राधान्यक्रम, चर्चेची गुणवत्ता आणि घटनात्मक संस्थांच्या स्वायत्ततेबाबत गंभीर प्रश्नही उपस्थित झाले.

अधिवेशनात आर्थिक सुधारणा, उद्योगविकास, पायाभूत सुविधा, शिक्षण, प्रशासकीय सुलभीकरण यांसारख्या विषयांवर आधारित कायदे पारित झाले. गुंतवणूक वाढवणे, निर्णयप्रक्रिया जलद करणे आणि दीर्घकालीन विकासाला चालना देणे, हा सरकारचा उद्देश स्पष्ट दिसतो. या निर्णयांचा फायदा भविष्यात देशाच्या अर्थव्यवस्थेला होऊ शकतो, हे नाकारता येत नाही. मात्र सामान्य नागरिकाला भेडसावणारी महागाई, बेरोजगारी, शेतकरी संकट, आरोग्य आणि शिक्षणाच्या समस्या यांवर तातडीचा दिलासा मिळेल का, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.या अधिवेशनातील एक विशेष बाब म्हणजे 'वंदे मातरम्' सारख्या प्रतीकात्मक विषयांवर दीर्घकाळ चर्चा झाली, तर अनेक जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना मर्यादित वेळ मिळाला. राष्ट्रभावना महत्त्वाचीच आहे; पण संसद ही भावना व्यक्त करण्यापेक्षा समस्या सोडवण्याचे व्यासपीठ असते. प्रतीकात्मक चर्चांना प्राधान्य देत असताना, लोकांच्या रोजच्या जीवनाशी संबंधित मुद्दे दुय्यम ठरत असतील, तर लोकशाहीचा हेतूच धूसर होतो.

या सगळ्यात सर्वाधिक चिंतेचा विषय ठरला तो निवडणूक आयोगाशी संबंधित कायदेशीर बदलांचा. निवडणूक आयोग ही भारतीय लोकशाहीची एक अत्यंत महत्त्वाची आणि विश्वासार्ह घटनात्मक संस्था आहे. मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणुका घेणे, हे तिचे मुख्य कार्य आहे. मात्र अलीकडच्या काळात आयोगाच्या नियुक्ती प्रक्रियेतील बदल, कार्यकारी सत्तेचा वाढता प्रभाव आणि आयोगाच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे कठीण करणाऱ्या तरतुदी यामुळे आयोगाच्या स्वायत्ततेवर संशय निर्माण झाला आहे.सरकारकडून हे बदल संस्था मजबूत करण्यासाठी असल्याचे सांगितले जात असले, तरी विरोधक आणि अनेक तज्ज्ञांच्या मते हे कायदे निवडणूक आयोगाला जनतेच्या टीकेपासून आणि लोकनियंत्रणापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न आहेत. संस्था वाचवणे म्हणजे तिला प्रश्नांपासून मुक्त करणे नव्हे, तर तिला अधिक पारदर्शक, उत्तरदायी आणि स्वतंत्र बनवणे होय. जर कायदे सत्ताधाऱ्यांना सोयीचे आणि संस्थांना दुर्बल करणारे असतील, तर लोकशाहीच्या मुळावरच घाव बसतो.

अधिवेशनादरम्यान गदारोळ, आरोप-प्रत्यारोप आणि वारंवार तहकूब यामुळे अनेक विषयांवर अपेक्षित सखोल चर्चा झाली नाही. कायदे पारित झाले, पण त्यामागील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिणामांवर सविस्तर विचार झाला का, हा प्रश्न कायम आहे. संसदीय चर्चा ही केवळ औपचारिकता नसून ती लोकशाहीचा आत्मा आहे.

एकंदरीत, या हिवाळी अधिवेशनात संसद कार्यरत होती, कायदे झाले, निर्णय घेतले गेले. मात्र लोकशाहीची कसोटी ही कायद्यांच्या संख्येत नसून त्यांच्या हेतूत आणि परिणामांत असते. जनतेचे प्रश्न केंद्रस्थानी राहिले का, घटनात्मक संस्थांची स्वायत्तता जपली गेली का, आणि संसद खऱ्या अर्थाने लोकांची आवाज बनली कायाचे उत्तर शोधणे आवश्यक आहे.लोकशाही मजबूत करायची असेल, तर कायदे सत्तेला सुरक्षित करणारे नव्हे, तर जनतेचा विश्वास वाढवणारे असले पाहिजेत. संसद ही केवळ बहुमताची नव्हे, तर विवेकाची आणि जबाबदारीचीही असली पाहिजेहीच या अधिवेशनातून मिळणारी सर्वात मोठी शिकवण आहे.

# सोशल मिडीया आणि बौध्द समाज.

आजच्या तगतगि च्या आयुष्यात लोकांना आपसात चर्चा करायला वेळ नसतो.जो तो आप आपल्या कुटुंबात आणि रोजमर्राच्या आयुष्यात बिजी आसतो.त्यात समाजाचे शेकडो गट-तट! लाखो सामाजिक संघटना! लाखो संस्था! लाखो मंडळ! त्यात आजुन इकडे तिकडे तुकडे शोधत फिरणारे ते अलगच आहेत!. त्या मुळे सर्व समाज बिखरलेला आहे.आणि या गटा-तटां मुळे समाजाचे आपसात पटत नाही.म्हणून एक दुसऱ्या सी चर्चा नाही.एक दुसऱ्यासी संवाद नाही.एक दुसऱ्यांसी विचारांची देवाण-घेवाण ही नाही.म्हणून आंबेडकरी समाजाचे आणि आंबेडकरी चळवळीचे खुप मोठे नुकसान झालेले आहे.प्रत्येक समाजात आपसात सलोखा आहे.पण आंबेडकरी समाज याला अपवाद आहे.आंबेडकरी समाजात घरा घरात विचारवंत आहेत.घरा घरात लिडर आहेत.पण आंबेडकरी चळवळ सक्सेस नाही.जयभिम बोलो आणि किधर भी चलो ! आणि किधर भी घुसो ! कुणीही उठतो. . .आणि बाबा साहेब आंबेडकरांच्या नावाने एक नविन दुकान खोलून बसतो. यांना माहित आहे. मिय्या की दौड मस्जिद तक हे काहीही करु शकणार नाहीत. पण यांच्या मुळे राष्ट्रीय चळवळीला नुकसान होते.

आंबेडकरी समाजात आपसात एक दुसऱ्यांसी चर्चा घडवुन आणनारी बौध्दांची अशी कुठलीही संघटना नाही.६ डिसेंबरला,दिक्षाभुमीला,भीमा कोरेगावला,आंबेडकरी समाज लाखो करोडो च्या संख्येने एकत्र येतो.पण तेथे वेगवेगळे तंबु असतात.बुध्द विहारात समाज एकत्र येतो.पण तेथे ही गुटबाजी चालते.तेथे ही समाजाच्या एकजुटीवर चर्चा होत नाही.तेथे ही मालकी हक्क दाखवले जातात.जे बुध्द विहार समाजाचे पंचायतीचे ठीकाण असायला हवे होते. बैठकीचे केंद्र असायला हवे होते. जे बुध्द विहार सामाजिक!,राजकीय!,धार्मिक! व सांस्कृतिक! केंद्र असायला हवेत.जेथे माणुस घडवला जायला हवा होता.तेथे ही समाजाच्या एकजुटीवर कुठलीही चर्चा होत नाही. म्हणुन डॉ.बाबा साहेब आंबेडकरांची ना सामाजिक चळवळ पुढे जात आहे.ना राजकीय चळवळ पुढे जात आहे.ना धार्मिक चळवळ पुढे जात आहे.म्हणजे खरे राजकारण बुध्द विहारातून चालते. खरे सेटिंग मास्टर तर विहारातच बसलेले आसतात.ज्यांनी बौध्द विहारांवर कब्जा करुन ठेवलेला आहे. हे यांच्या सोई नुसार राजकारण करतात.

जेंव्हा यांना आंबेडकरी राजकारणा बद्दल सांगितले जाते.यांचे एक ऊत्तर ठरलेले आसते. आम्हाला राजकारणासी घेणे-देणे नाही.कारण यांची सेटिंग आधिच ठरलेली आसते. मग राजकीय चळवळीत काम करणाऱ्यांनीही हे सांगायचे का ? आम्हाला धम्मासी घेणे-देणे नाही.बाबासाहेब आंबेडकर सांगतात.धम्म आणि राजकारण एकाच रथाचे दोन चाक आहेत ते सोबतच चालायला हवेत यासाठी डॉ.बाबा साहेब आंबेडकरांनी भारतीय बौध्द महा सभेची स्थापना काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत सर्व बौध्द सामाजाला एकत्र आणण्याच्या व समाजाच्या समस्या मांडण्याच्या ऊद्देशाने केली होती.परंतु आज भारतीय बौध्द महासभेला सामाजिक संघटने ऐवजी धार्मिक संघटनेचे रुप देण्यात आलेले आहे.त्यावर ही एकाच घराण्याचा मालकी हक्क दाखवला जातो.सर्व पद घरातल्या घरात आहेत.ज्या आंबेडकरी समाजाला. बहुजन समाजाला तयार करुन बहुजन समाजाचे नेत्रुत्व करायचे होते. देशाचे नेत्रुत्व करायचे होते.ज्या भारतातील बौध्दांना विश्वातील बौध्दांचे नेत्रुत्व करायचे होते.तेच भरकटलेले! भटकलेले! व बिखरलेले! आहेत. आशा परीस्थितीत आज समाजाला जोडण्यासाठी आमच्या कडे सोशल मिडीया खुप मोठे साधन आहे.याचा योग्य वापर आम्हाला करता आला पाहीजे. परंतु काही लोक मोबाईल चा वापर एंटरटेनमेंट साठी करतात. तर काही लोक ग्रुपवर दुसऱ्याची बाजु समजुन न घेता !.फक्त वाद घालायचे काम करतात. समाजातील चुकीच्या गोष्टीवर बोलणे.म्हणजे कुणाचा विरोध करणे होतो. का ? येथे प्रॉपर्टी चा वाद आहे.का? बौद्धांची गिनती आज मुर्खांन मध्ये केली जाते.

आम्ही ब्राम्हणवादासी लढाईच्या बाता करतो.व्यवस्था परीवर्तनाच्या गप्पा करतो. मनुवाद्यांसी लढण्याची भाषा करतो.परंतु मनुवाद्यांसी लढायचे तर सोडा.आमचा मुकाबला ब्राम्हणवाद्यांसी होतच नाही.आम्ही आपसात खेकड्या सारखे एक दुसऱ्याचे पाय ओढतो. म्हणून आम्हाला संपवायला विरोधकाची गरज पडत नाही.आमचे विरोधक सोशल मिडियाचा वापर एक साधन म्हणून करतात.आणि आम्ही गुड मॉर्निंग! गुड नाईट! वाढ दिवस! लग्नाचे वाढ दिवस! गौतम बुध्द! बाबा साहेब आंबेडकरांचे फोटो! महापुरुषांचे जयंती दिवस! स्म्रुती दिवस! गाणे वाजण्यात! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अमक्या,अमक्या दिवसी हे केले. ढमक्या,ढमक्या तारखेला ते ते केले.या पलिकडे काही नाही.बस संपली जिम्मेदारी! झाले कट्टर बुदिस्ट ! ते सर्व ठीक आहे.पण आज आपली आपली परीस्थीत काय आहे.? आपण कुठे असायला पाहीजे होतो.आणि कुठे आहोत. आपली जिम्मेदारी काय आहे.? आणि आपण करत काय आहोत.

यावर बोलायला,चर्चा करायला,भाष्य करायला कुणीही तयार होत नाही?.म्हणे एक दुसऱ्यावर टिका टिप्पणी करु नका.समाज आगोदरच बिखरलेला आहे.मग अबोल राहिल्याने समाज एक होणार आहे का? जर समाज बिखरलेला आहे.तर याला जिम्मेदार कोण आहे? हे समाजाला सांगायला नको का?.आंबेडकरी चळवळ मागे का? आंबेडकर चळवळी चे अपयशाचे कारण सांगणे गुन्हा आहे का?.जसे देशात नरेंद्र मोदीचे अंधभक्त आहेत.तसेच आंबेडकरी समाजात प्रत्येक गुटांचे भक्त आहेत.काही रक्ताचे भक्त आहेत.यांनी प्रत्येकाने आपले मेंदूचे दरवाजे बंद करुन घेतलेले आहेत. तर मग समाज एकत्र कधी येणार? ज्या लोकांच्या नाकर्तेपणामुळे समाज बिखरलेला आहे. आणी आज आंबेडकरी समाज सर्वच क्षेत्रात पिछडलेला आहे.आणि ज्यांच्यामुळे समाजावर ही वेळ आलेली आहे.त्यांचा नाकर्तेपणा!,नालायकपणा!,समाजा समोर आणायला नको का?.काय सही आहे! काय गलत आहे! हे समाज ठरवेल! तुम्ही ठरवणारे कोण? तुम्ही न्यायधीश बनू नका? जो पर्यत समाजाला सही गलतची जाणिव होणार नाही. तो पर्यंत समाज एकत्र येणार नाही.आणि ही परीस्थितीही बदलणार ही नाही.म्हणून टिका आणि सत्य यातला फरक समजुन न घेता. विरोध करणे म्हणजे स्वतः चा मुर्ख पणा जगाला दाखवणे आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला शिका! संघटित व्हा! आणि संघर्ष! करायला सांगितले.शिका=म्हणजे फक्त शिक्षण आहे का? शिका = धडा घ्या,सबब घ्या , आब्जवर करा! परंतु गेल्या ६५ वर्षात आम्ही कुठलाच धडा,सबक,घेतलेला नाही. किंवा विचार ही करत नाही.संघटित व्हा = आम्ही संघटीत आहोत.पण शेकडो गटा-तटात, हजारो सामाजिक संघटना,लाखो संस्था,लाखो मंडळात,बाकी इकडे तिकडे तुकडे शोधत फिरतात ते वेगळेच. कुणीही कुणात नाही. आणि बापात लेक नाही.पण गप्पा मात्र बुध्द आणि बाबासाहेबांच्या करतो. पण त्या महापुषांच्या बलिदानाचा,चळवळीचा विचार कुणीही करत नाही.

आम्ही हिंदू धर्मावर टिका करतो.पण स्व:धर्माची समिक्षा कधिही करत नाहीत. ब्राम्हणांनवर इतर नेत्यांनवर टिका करतो. पण आठवले,कवाडे,गवई,वामन मेश्राम, सुरेश माने,प्रकाश आंबेडकर यांच्या बद्दल मात्र आजिबात बोलायचे नाही.हे बोलायचेच झाले.तर मायावती वर बोला.मायावती.मिशन से भटक गयी है।.जसे महाराष्ट्रातल्या बौध्दांनी लय झेंडे गाडले आहेत.सर्व अपयशाचे खापर मायावती च्या डोक्यावर फोडा! म्हणजे आपण मोकळे होतो! आम्हाला कुणीही बाबासाहेब शिकवू नये!.आमच्या रक्तात बाबासाहेब आहेत. म्हणून महाराष्ट्रात आंबेडकरी चळवळीचे शक्ले झालेली आहेत. मायावती महाराष्ट्रातील नेत्यांचे नावही काढत नाही.तीला माहीत आहे.हे अति शहाणे आहेत.यांनी कांशीरामजीच नाही ऐकले.तर तिचे कुठुन ऐकणार आहेत.म्हणून यांच्या पुढे बिन वाजवून फायदा नाही.पण महाराष्ट्रातील अपयशी नेते मायावतीला सल्ला देतात.

आम्ही इतरांच्या चुका दाखवतो मात्र आमच्या चुका कुणी दाखवायच्या नाहीत. आम्ही मनुवाद्यांसी फाईट करण्याच्या गोष्टी करतो.परंतु तयारी मात्र काही नाही. कांशीरामजी म्हणायचे जर आम्हाला दुश्मनांशी लढायचे आहे.तर सर्वात आधी आम्ही स्वतःला तयार केले पाहीजे! लढाईला जी ताकद लागते.ती ताकद आधि स्वतः मध्ये निर्माण करावी लागते! जिंकायची ताकद भले नसु द्या! पण लढाईची आणि दुसऱ्याला पाडायची ताकद तुम्ही ठेवा.पण येथे तर शरणागती पत्करली जाते.महाराष्ट्रात सरळ आणि सोपा मार्ग शोधलेला आहे. मंदिरात जाऊन पाया पडायचे!. म्हणे आधि सत्ता मिळवा! आधी सत्तेत जा !.मिशनचे नंतर बघु !आरे गेल्या ६५ वर्षा पासुन तुमचे हेच राजकारण लोक बघत आलेले आहेत. ना.संघर्ष= लेपींळर्पींशीं सतत प्रयत्नशिल असणे. संघर्ष म्हणजे लढाई झगडा नाही. तर एखाद्या धेय्या साठी ! ऊद्देशासाठी ! सतत प्रयत्नशिल आसणे. गेल्या ६५ वर्षात आम्ही आमचा ऊद्देशच ठरवू शकलेलो नाहीत.

आमचे ऊद्देश आहेत?१) गैर बराबरी खत्म करणे अर्थात समता स्थापित करणे.२) प्रबुध्द भारत निर्माण करणे,३) भारत बौध्दमय करणे,४) भारताला विश्वगुरु बनवणे,५) शासनकर्ता बनने.या साठी ही प्रशिक्षित कॅंडर बेस लोकच बहुजन समाजात जाऊन काम करु शकतात. असेच लोकही राजकारणात जायला हवेत.जसे भाजप चे सर्व लिडर आर.एस.एस.च्या कॅंम्पा मधुनच ट्रेन होऊन आलेले आसतात.म्हणून त्यांना त्यांचा ऊद्देश माहिती आसतो. म्हणून ते राजकारण यशस्वी आहेत.आमचे सर्व अर्धवटराव आहेत.इकडुन तिकडून मिळवलेल्या थोड्याशा माहीतीच्या आधारा वरुन आपली चळवळ ठरवतात. आम्हाला राजकारणासाठी राजकारण करायचे नाही.आम्हाला परीवर्तनासाठी राजकारण करायचे आहे.पण महाराष्ट्रात गेले ६५ वर्षा पासुन एकच स्टॅंटजी आहे.आधी सत्ता !.नंतर समाजकारण,नंतर धर्मकारण आधि सत्तेत जाऊ नंतर परिवर्तन बघु. हे करुन करुनच आणि सांगुण सांगुणच ६५ वर्ष वाया घालवले.सत्ता तर मिळतच नाही. आणि चळवळ ही पुढे जात नाही. म्हणून गेले ६५ वर्षे ना आम्ही सत्ताधारी झालो आहोत! ना प्रबुध्दभारत बनवु शकलो आहोत! ना भारत बौध्दमय करु शकलो आहोत! ना बौद्ध राष्ट्रांचे विश्वगुरु होऊ शकलेलो आहोत! बाहेरचे लोक येऊन आम्हाला धम्म शिकवतात.तरी आम्ही आजुन कीती वर्षे वाट पाहायची? तिन तिन पिढ्या बरबाद झाल्या. आजुन कीती पिढ्या बरबाद करायच्या? गेल्या ६५ वर्षात आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पुर्ण करु शकलेलो नाहीत. ही आमची नालायकी आहे.

फक्त बाता करुन काम होत नसते. कोशिश केल्याने आणि प्रयत्न केल्याने कामयाबी मिळत आसते.म्हणून गेल्या ६५ वर्षात आपण काहीही करु शकलेलो नाहीत. कारण प्रामाणिक पणे प्रयत्नच झालेले नाहीत. म्हणून सोशल मिडीया चा वापर आम्हाला योग्य पध्दतीने करता आला पाहीजे.कदाचित एकाचे विचार दुसऱ्या ला पटणारे नसतील. तर आपण प्रश्न विचारु शकतो.किंवा आपणही आपले विचार मांडू शकतो.परंतु भाषेची मर्यादा राखायला हवी.आज बौध्द सोडुन सर्व समाजाचे लोक सोशल मिडीयाच्या माध्यमातून एक दुसऱ्यांसी जुडलेले आहेत. परंतु आपल्या बौध्द समाजाचे आपसात पटत नाही. सध्या फक्त आपली जमेची बाजु एकच आहे.ती ही आहे. की आपण सोशल मिडीयाच्या माध्यमातून तरी एक दुसऱ्याच्या टच मध्ये आहोत.जर आपण एक दुसऱ्या च्या टच मध्ये आहोत.तर आपण विचारांनी सुध्दा एक दुसऱ्यांसी जुडायला हवे. जेणे करुन बौध्द समाज या गटा-तटाच्या राजकारणा पासुन मुक्त होऊन.आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न साकार करण्यास मदत होऊ शकते. म्हणून मोबाईल आपल्या साठी खुप मोठे साधन आहे.आणि त्याचा सद उपयोग करणे आपल्या हातात आहे.

**जयभीम जय बुध्द**
**पृथ्वीराज खैरे-९५२७२६४६०८,**
**बदलापूर**

# बंड घातक समाज व्यवस्थेच्या विरोधात करून उठा! चळवळीच्या विरोधात नको!

आजकाल फुले-आंबेडकरी चळवळीमध्ये बंडखोरी करण्याचे फॅड निर्माण झाले आहे.चला! पक्षाने आपण ठरवलेला उमेदवार नापसंत करून दुसऱ्याला उमेदवारी दिली ना! तेव्हा आता आपण एक काम करू! या आपल्या मनपसंत गड्याला निवडून आणू,आणि मग परत पक्षाकडे घेऊन जाऊ! मग असं जर असेल! तर पक्षाच्या बाजूने लढायचं कोणी?.ठीक आहे! एखादी दुसरी व्यक्ती इकडे तिकडे झाली काय आणि नाही झाली काय! परंतु जर प्रत्येक सर्कल मधून असेच निर्णय व्हायला लागले तर मग पक्षीय राजकारण कशाला करायचं? खुशाल आपापल्या परीने निवडून या! आणि नंतर चळवळीत सामील व्हा!

पक्षाला काही महत्त्व राहिले नाही, तरी चालेल! नाही का?याला मग! नौ सो चूहे खाकर! बिल्ली हज को चली! असेच म्हणावे लागेल ना? परंतु आज काल बऱ्याच कार्यकर्त्यांना नौ सो चूहे खाऊन परत पक्षात येऊन स्वतः ला मिरवणे म्हणजे मी स्वतः किती पावरफुल आहो! हेच दाखविण्याचा त्याचा सतत प्रयत्न असते! या ठिकाणी मी हे जे काही वास्तव मांडत आहो! ते काही कोण्या एका पर्टिक्युलर व्यक्तीसाठी नसून अशा घटना अनेक घडत आहेत म्हणून हा मुद्दा सार्वजनिक रित्या घेतला पाहिजे! नाहीतर मग मी, कुणाला तरी टार्गेट करून कोण्या एका व्यक्तीला उपरोधिकपणे बोलत आहो! असा कोणीही गैरसमज करून घेऊ नये! मात्र ज्या चळवळीत आपण काम करतो त्या चळवळीच्या विरोधात जाऊन चळवळीवर आपला निर्णय थोपवणे काहीही झाले तरी ते चुकीचे आहे! असे माझे मत आहे

कारण काय?.कारण की,तुमचा जो बंडखोरीचा निर्णय असते तो सार्वजनिक स्वरूपाचा नसते. की,ज्याला आपण सामाजिक उत्थानाचा निर्णय म्हणू शकतो! तशा स्वरूपाचा तो नसते तर तो व्यक्तिगत अहंकारापोटी घेतलेला फार मोठा चुकीचा निर्णय असते! तुमचा बंडाचा निर्णय हा फक्त तुमच्या स्वतःपुरता असते आणि चळवळीचा निर्णय हा समाजाच्या फार मोठ्या हिताचा असते हे जर लक्षात घेतल्या गेले तर कार्यकर्ता कितीही पावरफुल असो तो असा स्वतःपुरता परंतु समाज घातकी निर्णय कधीच घेऊ शकत नाही.फौजमधे ज्याप्रमाणे कमांडींग ज्याच्या हाती त्याचाच आदेश शिरसावंध्य मानल्या जाते मग तो चुकीचा का असेना!

जसे सेनापतीने एकदा फायर म्हटलं की गोळीबार हा करावाच लागतो! त्याला चॅलेंज नसते! तशीच पक्षात सुद्धा शिस्त हवी असते.एकदा पक्षाचा निर्णय झाला की त्याला काहीच चॅलेज नसायला पाहिजे! आपली तलवार सेनापतींनी म्यान करायची सांगितली ना! ती झालीच पाहिजे!.बस्स! इथेच काही कार्यकर्त्यांचा इगो जागृत होते! आणि मग याच इगोमुळे बंड या गोंडस नावाखाली गद्दारी करण्यात येते! आणि वरून विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आम्हीच खरे पाईक आहोत असे लोकांना भासवण्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांच्या जय जयकाराने सारा आकाश पाताळ दुमदुमून टाकतात. काय या नुसत्या आरोळ्या नसतात? अरे जे बाळासाहेब आंबेडकर बाबासाहेबांचा आदर्श आपल्या डोळ्यात समोर ठेवून आदिवासी बांधवांन पासून ते गरीब मराठ्या पर्यंतच्या एकूणच सर्व वंचितांना न्याय मिळावा म्हणून त्यांचा सत्तेत सहभाग असावा म्हणून दिवस रात्र ४०-४२ वर्षापासून संघर्ष करीत आहेत आठवले साहेब आणि कवाडे सरांसारख्यांना जनरेटा नसताना जर आमदारक्या खासदारक्या मिळतात तर मग बाळासाहेब आंबेडकरांना एक-दोन मंत्रिपद मिळूऊन घेणे आणि सात पिढ्यांना पुरेल एवढे कोठ्याधिश होणे काही कठीण गोष्ट आहे का? परंतु त्यांना ते मंत्रिपद का नको का असते? माझ्या मते त्याचे कारण असे आहे की, ॲड बाळासाहेब आंबेडकर हे जॉज्वल स्वाभिमानी बाबासाहेब आंबेडकरांचे नुसत्या रक्ताच्या नात्यानेच नातु नाहीत. तर बाळासाहेब आंबेडकर हे बाबासाहेबांच्या एकूणच साऱ्या विचाराचा वारसा जोपासणारे प्रखर स्वाभिमानी नेते आहेत हे आपण कधीच लक्षात घेत नाही म्हणूनच ॲड.बाळासाहेब आंबेडकर म्हणतात इथे मी हारत नाही,तुम्ही मला हरवता हे भयानक वास्तव लक्षात घेऊन आम्ही कधी वागु? या धगधगत्या विस्तवासारख्या वास्तवावर आम्ही विचार न करता नुसता मला का तिकीट नाही? झालं! इगो दुखवल्या गेला,म्हणून बंडखोरी करतो! दुसरी गोष्ट मला मत मागायला कोणी पक्षाचा उमेदवार माझ्या दारात येत नाही! म्हणून काहींची बंडखोरी असते! वा रे वा! फुले-आंबेडकरी विचारधारा तुमची!

अरे मित्र हो, तो पक्षाचा उमेदवार जरी तुमच्या दारात आला नाही तरी तो तुमच्या बळावर उभ्या राहिलेल्या आंबेडकरी चळवळीतुन जर निवडून आला आणि कधी बेइमानीवर उतरला,तर त्याची पक्ष उचलबांगडी करते की,नाही? याचा अर्थ त्याला बेअब्रू करण्याचा अमूल्य अधिकार हा चळवळीतील कार्यकर्त्यांकडे राखून ठेवलेला असते!

मग ज्या व्यक्तीची कधीकाळी थुंकी अथवा पाऊले रस्त्यावर प्रस्थापितांना दिसू नयेत म्हणून त्यांच्या कमरेला झाडू होता. तेव्हा मग अशा अवस्थेतून ज्या प्रज्ञासुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मताधिकाऱ्याच्या माध्यमातून आमचा झाडू काढून टाकला. सन्मानाचे जीवन दिले आणि त्याच प्रज्ञा सूर्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जर बाळासाहेब आंबेडकर तुमच्या आमच्या हक्काच्या सत्तेसाठी अहोरात्र संघर्ष करीत असतील तर हे सारे त्यांचे कष्ट समजून घेण्याऐवजी आम्ही आमचाच सर्वांगीण विकास करणाऱ्या चळवळीच्या विरोधात बंडखोरी करत असू तर कोण म्हणू शकते की आमची बुद्धी ठिकाण्यावर आहे? शेवट...

तरीही बंडखोरी करणाऱ्यांना गद्दार म्हणायचं की खुद्दार म्हणायचं? याचे उत्तर अभिव्यक्ती स्वातंत्र्यामुळे ज्याला जसे द्यायचे तसे तो देऊ शकते!.परंतु नैतिक दृष्टीने आणि वैचारिक अंगाने फुले-आंबेडकरी विचारधारा अंगीकारून प्रगल्भता लाभलेल्या चळवळीतील कार्यकर्त्याचे काय उत्तर येईल?.त्या येणाऱ्या उत्तराच्या प्रतिक्षेत मी आहे!

**जय भीम जय भारत**
**जीवन बोदडे- ९६८९२६८६२०,भांबेरी अकोला जिल्हा.**

# राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान व,१६ जानेवारीला मतमोजणी




मुंबई: बृहन्मुंबईसह राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान; तर १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २२७ जागांसह २ हजार ८६९ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. या सर्व महानगरपालिकांच्या क्षेत्रांत आचारसंहिता लागू झाल्याची घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत केली.

येथील सह्याद्री अतिथिगृहात महानगरपालिका निवडणुकांच्या कार्यक्रमाची घोषणा करण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत राज्य निवडणूक आयुक्त वाघमारे बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यावेळी उपस्थित होते. वाघमारे यांनी सांगितले की, सर्व महानगरपालिकांची निवडणूक प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या आधीन राहून राबविण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीची अधिसूचना १६ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होईल. उर्वरित सर्व २८ महानगरपालिकांची अधिसूचना १८ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. अधिसूचना प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया संबंधित महानगरपालिका आयुक्त आपापल्या स्तरावर पार पाडतील. सर्व महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल.

महानगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता- निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित महानगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ही आचारसंहिता लागू असली तरी अन्य ठिकाणीदेखील महानगरपालिकेच्या मतदारांवर प्रभाव पाडणारी घोषणा किंवा कृती करता येणार नाही. आचारसंहिता लागू झाल्यामुळे शासनाला महानगरपालिका कार्यक्षेत्राशी संबंधित धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. नैसर्गिक आपत्तीबाबत करावयाच्या उपाययोजना किंवा मदतीसंदर्भात आचारसंहितेची आडकाठी असणार नाही. राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक असेल. त्याचबरोबर ४ नोव्हेंबर २०२५ रोजी कायदा व सुव्यवस्थेसंदर्भातदेखील आदेश निर्गमित केले आहेत.

महानगरपालिकांची नावे-राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी जालना आणि इचलकरंजी या २ नवनिर्मित महानगरपालिका आहेत. ५ महानगरपालिकांची मुदत २०२० मध्ये संपली आहे. सर्वाधिक १८ महानगरपालिकांची मुदत २०२२ मध्ये संपली होती; तर ४ महानगरपालिकांची मुदत २०२३ मध्ये संपली आहे. मुदत समाप्तीची महानगरपालिकानिहाय तारीख अशी: छत्रपती संभाजीनगर: २७ एप्रिल २०२०, नवी मुंबई: ०७ मे २०२०, वसई- विरार: २८ जून २०२०, कल्याण- डोंबिवली: १० नोव्हेंबर २०२०, कोल्हापूर: १५ नोव्हेंबर २०२०, नागपूर: ०४ मार्च २०२२, बृहन्मुंबई: ०७ मार्च २०२२, सोलापूर: ०७ मार्च २०२२, अमरावती: ०८ मार्च २०२२, अकोला: ०८ मार्च २०२२, नाशिक: १३ मार्च २०२२, पिंपरी- चिंचवड: १३ मार्च २०२२, पुणे: १४ मार्च २०२२, उल्हासनगर: ०४ एप्रिल २०२२, ठाणे: ०५ एप्रिल २०२२, चंद्रपूर: २९ एप्रिल २०२२, परभणी: १५ मे २०२२, लातूर: २१ मे २०२२, भिवंडी- निजामपूर: ०८ जून २०२२, मालेगाव: १३ जून २०२२, पनवेल: ९ जुलै २०२२, मीरा- भाईंदर: २७ ऑगस्ट २०२२, नांदेड- वाघाळा: ३१ ऑक्टोबर २०२२, सांगली- मीरज- कुपवाड: १९ ऑगस्ट २०२३, जळगाव: १७ सप्टेंबर २०२३, अहिल्यानगर: २७ डिसेंबर २०२३, धुळे: ३० डिसेंबर २०२३, जालना: नवनिर्मित आणि इचलकरंजी: नवनिर्मित.

बहुसदस्यीय पद्धत-बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व २८ महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेत एका प्रभागातून एकच सदस्य निवडून द्यावयाचा असल्याने प्रत्येक मतदाराला केवळ एकच मत द्यावे लागेल. उर्वरित सर्व २८ महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे प्रत्येक प्रभागात साधारणत: चार जागा असतील काही महानगरपालिकांच्या काही प्रभागांत तीन अथवा पाच जागा असतील. त्यानुसार बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक मतदाराने किमान ३ ते ५ मते देणे अपेक्षित असेल.

नामनिर्देशनपत्रे ऑफलाईन पद्धतीने-स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संगणकीय प्रणालीद्वारे नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे दाखल करण्याची सुविधा राज्य निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिलेली आहे; परंतु विविध राजकीय पक्ष आणि नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांतील उमेदवारांची मागणी लक्षात घेऊन महानगरपालिका निवडणुकीत पारंपरिकरीत्या ऑफलाईन पद्धतीनेच नामनिर्देशनपत्रे दाखल करता येतील.

‘जातवैधता पडताळणी’बाबत-राखीव जागांवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. जात प्रमाणपत्र असेल; परंतु जातवैधता प्रमाणपत्र जोडले नसल्यास जात पडताळणी समितीकडे जातवैधता प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा देणे आवश्यक राहील. सहा महिन्यांच्या कालावधीत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यात येईल, असे हमीपत्रदेखील संबंधित उमेदवारांना द्यावे लागेल. या विहित मुदतीत म्हणजे निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेल्या संबंधित उमेदवाराची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल.

मतदान केंद्र आणि ईव्हीएम-महानगरपालिका निवडणुकांसाठी ३ कोटी ४८ लाख ७८ हजार १७ मतदार असून त्यासाठी ३९ हजार १४७ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ४३ हजार ९५८ कंट्रोल युनिट आणि ८७ हजार ९१६ बॅलेट युनिटची उपलब्धता केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुमारे १० हजार १११ मतदान केंद्रांसाठी ११ हजार ३४९ कंट्रोल युनिट आणि २२ हजार ६९८ बॅलेट युनिटची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

संभाव्य दुबार मतदारांबाबत दक्षता-भारत निवडणूक आयोगाने तयार केलेल्या विधानसभा मतदारसंघाच्याच मतदार याद्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरल्या जातात. संबंधित कायद्यांतील तरतुदींनुसार राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित करून, त्या दिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदारसंघाच्या याद्या महानगरपालिका निवडणुकांसाठी प्रभागनिहाय विभाजित केल्या आहेत. या याद्यांतील नावे वगळण्याचा किंवा नव्याने नावे समाविष्ट करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही; परंतु त्यातील दुबार नावांबाबत मात्र राज्य निवडणूक आयोगाने पुरेपूर दक्षता घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झाल्या आहेत. मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी २० डिसेंबर २०२५ रोजी; तर मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या २७ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केल्या जातील. मतदार याद्यांतील संभाव्य दुबार मतदारांसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने सर्व संबंधित महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त त्यांच्या स्तरावर कार्यवाही करीत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने संभाव्य दुबार मतदारांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र संगणक प्रणाली (प्लिकेशन) विकसित केली आहे. इतरही महानगरपालिकांनी विविध तंत्रांचा वापर करून संभाव्य दुबार नावांबाबत दक्षता घेतली आहे.

महानगरपालिकेच्या प्रभागनिहाय मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर (**) असे चिन्ह नमूद करण्यात आले आहे. असे मतदार कुठल्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहेत, याबाबत त्यांना आवाहन करण्यात आले. घरोघरी जाऊनही त्यांची पडताळणी केली आणि त्यांच्याकडून असा मतदार कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहे, याबाबत विहित नमुन्यात अर्ज भरून घेण्यात आला आहे. त्याने नमूद केलेले मतदान केंद्र वगळता त्यास उर्वरित कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करता येणार नाही; परंतु काही कारणाने असा अर्ज भरून घेतला नसल्यास संभाव्य दुबार नाव असलेला मतदार मतदान केंद्रावर मतदानासाठी आल्यास त्याच्याकडून त्याने इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत किंवा करणार नसल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून घेण्यात येईल. त्याचबरोबर त्याची काटेकोरपणे ओळख पटल्यानंतरच त्याला संबंधित मतदान केंद्रावर मतदान करण्याची मुभा देण्यात येईल.

‘मताधिकार’ मोबाईल प-महानगरपालिका निवडणुकांसाठीच्या मतदार यादीतील मतदाराचे नाव, मतदान केंद्र आणि उमेदवारांविषयी माहिती जाणून घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने ‘मताधिकार’ हे मोबाईल प उपलब्ध करून दिले आहे. ते सध्या फक्त ‘गुगल प्ले स्टोअर’वरून डाऊनलोड करता येईल. या पद्वारे मतदाराचे नाव शोधण्यासाठी मतदाराला दोन पर्याय उपलब्ध आहेत. त्यानुसार मतदाराचे ‘संपूर्ण नाव’ किंवा ‘मतदार ओळखपत्रा’चा (एझखउ) क्रमांक नमूद करून मतदार यादीतील नाव शोधता येईल. त्यानंतर जिल्हा आणि महानगरपालिकेच्या नावाची निवड केल्यानंतर आपले नाव दिसेल. याच पच्या माध्यमातून आपले मतदान केंद्राचे ठिकाणही कळू शकेल. त्याचबरोबर आपल्या प्रभागातील उमेदवाराविषयी अधिक माहितीदेखील जाणून घेता येईल. मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी र्हीींिं://ारहरीशलींींशीश्रळीीं.ळप/ हे संकेतस्थळदेखील उपलब्ध करून दिले आहे. त्यातील सर्च नेम इन व्होटर लिस्ट वर क्लिक करून पप्रमाणे ‘नाव’ किंवा ‘मतदार ओळखपत्रा’चा (एझखउ) क्रमांक नमूद करुन नाव शोधता येईल.

मतदार जागृती-महानगरपालिका निवडणुकांमध्ये मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मतदार जागृती करण्याचे आदेश सर्व महानगरपालिका आयुक्तांना दिले आहेत. पारंपरिक प्रसारमाध्यमांबरोबरच नवीन माध्यमांचा कौशल्यपूर्ण वापर करण्याबाबत आयोगाने १२ जून २०२५ रोजी पत्राद्वारे सर्वांना निर्देश दिले आहेत. त्याबाबत वेळोवेळी आढावाही घेण्यात आला आहे. मतदार जागृतीसंदर्भातील सर्व सूचना व निर्देश मार्गदर्शक स्वरुपात असून, स्थानिक पातळीवर काही नावीन्यपूर्ण उपक्रम सुचल्यास तेही आपापल्या स्तरावर राबविण्याबाबत कळविण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या पातळीवरूनही समाजमाध्यमांसह विविध माध्यमांसह विविध माध्यमांद्वारे मतदार जागृती करण्याचा प्रयत्न असेल. विशेषत: बृहन्मुंबईसह मोठ्या महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये अधिक प्रमाणात मतदार जागृतीवर भर देण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने महानगरपालिका स्तरावर नियोजन केले जाईल.

ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगासाठी-मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तान्ह्या बाळासह असणाऱ्या स्त्रिया, गरोदर स्त्रिया आदींना मतदानासाठी प्राधान्य दिले जाईल. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मतदान केंद्रावर कायमस्वरुपी रॅम्पची व्यवस्था नसल्यास तात्पुरती सुविधा उभारली जाईल. व्हिलचेअरचीही व्यवस्था असेल. मतदान केंद्रावर विजेची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची, सावलीची सुविधा, शौचालयाची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल. सर्व मतदान केंद्रांमध्ये किमान सुविधा असणे आवश्यकच असेल; परंतु याशिवाय शक्य असेल तिथे आदर्श मतदान केंद्र उभारण्याचा प्रयत्न असेल. महिला मतदारांची संख्या जास्त असलेल्या ठिकाणी सर्व निवडणूक अधिकारी- कर्मचारी व पोलीस कर्मचारी महिला असतील, असे मतदान केंद्र ‘पिंक मतदान केंद्र’ म्हणून ओळखले जाईल. मतदान केंद्राच्या आत मतदारांना मोबाईल दूरध्वनी नेण्यास बंदी असेल.

मनुष्यबळाची व्यवस्था-महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी २९० निवडणूक निर्णय अधिकारी आणि ८७० सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची आवश्यकता असून, त्याची पूर्तता करण्यात आली आहे. साधारणत: १ लाख ९६ हजार ६०५ इतक्या निवडणूक अधिकारी कर्मचाऱ्यांची गरज भासेल, तीदेखील व्यवस्था झाली आहे. आवश्यक तेवढ्या मनुष्यबळाच्या उपलब्धतेबाबत महसूल विभागीय आयुक्त आणि सर्व महानगरपालिका आयुक्त यांना वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत; तसेच त्यासंदर्भात वेळोवेळी संबंधितांच्या बैठकाही घेण्यात आल्या आहेत.

प्रचार समाप्तीनंतर जाहिरातींना बंदी-स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रचार समाप्तीसंदर्भात संबंधित विविध अधिनियमांमध्ये वेगवेगळ्या तरतुदी आहेत. जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि समाजमाध्यमांसह कुठल्याही माध्यमाद्वारे प्रचारविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येत नाहीत. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ‘२७अअ’ आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४(४) अन्वये महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठीच्या मतदान समाप्तीच्या ४८ तास अगोदर प्रचारावर निर्बंध असतात. त्यामुळे १५ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता मतदानाची वेळ संपत असल्याने १४ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता जाहीर प्रचाराची समाप्ती होईल. त्यामुळे १४ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० नंतर जाहिरातींची प्रसिद्धी किंवा प्रसारणसुद्धा करता येणार नाही.

माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती-महानगरपालिकेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेच संबंधित महानगरपालिका आयुक्त आपल्या स्तरावर राज्य निवडणूक आयोगाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या ‘निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५’ नुसार ‘महानगरपालिकास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती’ स्थापन करतील. महानगरपालिका आयुक्त स्वत: या समितीचे अध्यक्ष; तर महानगरपालिकेचा जनसंपर्क अधिकारी सदस्य सचिव असेल. ही समिती प्रचारविषयक इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठीच्या प्रस्तावित जाहिरातींचे पूर्वप्रमाणन, पेड न्यूजसंदर्भातील तक्रारी/ प्रकरणांची चौकशी, त्यांचे निराकरण; तसेच विविध प्रसारमाध्यमांतील वृत्तांकनाच्या संकेतांच्या पालनाबाबत संनियंत्रण आणि देखरेख करेल. राज्य निवडणूक आयोगाच्या स्तरावर आयोगाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली ‘राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती’ कार्यरत असेल.

प्रसारमाध्यम प्रतिनिधींना प्रवेशिका-राज्य निवडणूक आयोगाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या ‘निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५’ च्या परिच्छेद २० नुसार संबंधित महानगरपालिका आयुक्तांच्या स्तरावरून प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान केंद्रे आणि मतमोजणी केंद्रावरील प्रवेशासाठी प्रवेशिका दिल्या जातील. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठीदेखील बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्याच स्तरावरून प्रवेशिका देण्यात येतील.

राजकीय पक्षांशी वेळोवेळी संवाद-स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वेळोवेळी राजकीय पक्षांशी संवाद साधण्यात आला आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या आतापर्यंत तीन बैठका घेण्यात आल्या आहेत. या बैठका १४ ऑक्टोबर २०२५, ०१ डिसेंबर २०२५ आणि १२ डिसेंबर २०२५ रोजी पार पडल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी, बहुसदस्यीय पद्धत, विविध न्यायालयांचे आदेश, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था, ईव्हीएमसाठीच्या स्ट्राँग रूमची निगराणी इत्यादींबाबत बैठकीला उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना अवगत करण्यात आले आहे. त्यांच्या मागणीनुसार नामनिर्देशनपत्रासोबत दाखल करावयाच्या ‘जोडपत्र- १’ आणि ‘जोडपत्र-२’ बाबत अधिक स्पष्टीकरण करण्यात आले आहे. त्याचबरोबर मुख्य प्रचारकांची (स्टार कॅम्पेनर) संख्या २० वरून ४० करण्यात आली आहे.

मतदार व मतदान केंद्र

पुरुष मतदार- १,८१,९३,६६६

महिला मतदार- १,६६,७९,७५५

इतर मतदार- ४,५९६

एकूण मतदार- ३,४८,७८,०१७

एकूण मतदान केंद्र- ३९,१४७

जागा व आरक्षित जागा

महानगरपालिकांची संख्या- २९

एकूण प्रभाग-८९३

एकूण जागा- २,८६९

महिलांसाठी जागा- १,४४२

अनुसूचित जातींसाठी जागा- ३४१

अनुसूचित जमातींसाठी जागा- ७७

नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा- ७५९

उमेदवारांसाठी खर्च मर्यादा

बृहन्मुंबई आणि ‘अ’ वर्ग महानगरपालिका (पुणे व नागपूर)- रु. १५,००,०००/-

‘ब’ वर्ग महानगरपालिका (पिंपरी-चिंचवड, नाशिक व ठाणे) - रु. १३,००,०००/-

‘क’ वर्ग महानगरपालिका (कल्याण- डोंबिवली, नवी मुबई, छ. संभाजीनगर व वसई- विरार)- रु. ११,००,०००/-

‘ड’ वर्ग महानगरपालिका (उर्वरित सर्व १९)- रु. ०९,००,०००/-

महत्वाच्या तारखा

नामनिर्देशनपत्र स्वीकारणे- २३ डिसेंबर २०२५ ते ३० डिसेंबर २०२५

नामनिर्देशनपत्रांची छाननी - ३१ डिसेंबर २०२५

उमेदवारी माघारीची अंतिम मुदत- ०२ जानेवारी २०२६

निवडणूक चिन्ह वाटप- ०३ जानेवारी २०२६

अंतिम उमेदवारांची यादी- ०३ जानेवारी २०२६

मतदानाचा दिनांक- १५ जानेवारी २०२६

मतमोजणीचा दिनांक- १६ जानेवारी २०२६

# ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत झालेला भ्रष्टाचार उघडकीस आणला म्हणून दोन तरुणास मारहाण

केज/प्रतिनिधी –केज तालुक्यातील सुकळी येथील ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत कामात झालेला भ्रष्टाचार हा उघडकीस आणला म्हणून दोन तरुणास मारहाण केल्याप्रकरणी सरपंचासह सात जणांविरुद्ध युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.




याबाबतची सविस्तर माहिती अशी की, अमर मोहनराव गायकवाड वय ३८ वर्षे रा. सुकळी ता.केज हे एसआरटीआर रुग्णालय आंबेजोगाई येथील वार्ड क्रमांक १३ मध्ये उपचार घेत असताना युसुफ वडगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक भारत बर्डे साहेब व बीट अंमलदार डोंगरे साहेब यांनी तोंडी व लेखी अमर गायकवाड यांचा जबाब नोंदवून घेतला. या जबाबत अमर मोहन गायकवाड यांनी सांगितले की, दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २–३० वाजण्याच्या सुमारास सुकळी येथील ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत झालेल्या कामांमध्ये भ्रष्टाचार याचा पंचनामा करणे कामी केज पंचायत समितीचे विस्तार अधिकारी अनिल चौरे व इंजिनिअर हातागळे, ग्रामसेवक हे सुकळी येथे आले असता अमर गायकवाड व त्यांच्या गावातील विनोद विलास काटकर, शाहू रघुनाथ गायकवाड, अमोल विनायक गायकवाड यांच्यासह गावातील भास्कर महादू जावळे यांच्या घराजवळील नाली बांधकामांच्या जवळ गेलोत. तेथे पंचायत समिती केज येथून आलेले पदाधिकारी हे बांधकामाची पाहणी करीत असताना तेथे सरपंच नितीन साहेबराव गायकवाड, रविराज उत्तम खाडे, अक्षय बालासाहेब गायकवाड, प्रवीण बळीराम भिसे, अनिकेत जीवनराव गायकवाड, प्रदीप बळीराम भिसे, ज्ञानेश्वर विक्रम गव्हाणे हे तेथे आले व कचराकुंडीबाबत बोलणे चालू असताना तेवढ्यात सरपंच नितीन गायकवाड यांनी अमोल विनायक गायकवाड यास तुझा काय संबंध नाही असे म्हणून अंगावर धावून येऊन मारहाण करू लागला. तेवढ्यात अमर गायकवाड हे म्हणाले की, त्यास मारू नकोस असे म्हणून सोडविण्यासाठी गेले असता. अमर गायकवाड यांना नितीन गायकवाड यांनी लाकडी काठीने त्यांच्या उजव्या हातावरील मनगटा जवळ मारून गंभीर दुखापत केली. तेवढ्यात अक्षय बाळासाहेब गायकवाड यांनी त्याच्या हातातील काठीने अमर गायकवाड यांच्या डाव्या डोळ्याच्या जवळ मारून दुखापत केली. तसेच प्रदीप बळीराम भिसे यांनी त्यांच्या काठीने अमर गायकवाड यांच्या पाठीत उजव्या खांद्यावर मारहाण केले. त्यानंतर प्रदीप बळीराम भिसे यांनी त्यांच्या हातातील काठीने अमर गायकवाड यांच्या उजव्या पायाच्या पोटरीवर मारहाण केली. अनिकेत गायकवाड, ज्ञानेश्वर गव्हाणे व रविराज खडे यांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण करून त्या सर्वांनी अमर गायकवाड व अमोल विनायक गायकवाड यांना शिवीगाळ करून, तुम्ही जर गावातील भ्रष्टाचार संबंधाने पुन्हा कोठे आवाज काढला तर किंवा वरच्या ऑफिसला तक्रारी केल्या तर तुम्हाला जीवे मारून टाकू अशा धमक्या दिल्या. त्यानंतर तेथे विनोद विलास काटकर व शाहू रघुनाथ गायकवाड व गावातील लोक येत असल्याचे पाहून ते तिथून निघून गेले.

अमर गायकवाड यांच्या सुकळी गाव आतील ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या भ्रष्टाचार संबंधाने चौकशी चालू असताना वरील लोकांनी तेथे येऊन अमर गायकवाड व अमोल गायकवाड यांना काठ्यांनी व लाथा बुक्क्यांनी मारहाण करून अमर गायकवाड यांच्या उजव्या हाताच्या मनगटाजवळ मारून त्यांचा हात फॅक्चर करून त्यांना गंभीर दुखापत केली आहे. म्हणून अमर गायकवाड यांची वरील लोकांविरुद्ध तक्रार आहे. सदर घटनेत अमर गायकवाड हे जखमी झालेले असल्यामुळे त्यांच्यावर आंबेजोगाई येथील रुग्णालयात उपचार चालू असून ते सध्या पूर्णपणे शुद्धीवर असून जबाब देण्याच्या स्थितीत आहेत हा जबाब दिलेला तो त्यांच्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला असून तो त्यांनी वाचून पाहिला तो बरोबर व खरा आहे असे अमर गायकवाड यांनी दिलेल्या लेखी व तोंडी जबाबात म्हटले आहे. सदर जबाबावरून युसुफ वडगाव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३११/२०२५ कलम ११८ (२),११८(१),११५(२),१८९(२), १९१(२),१९१(३),१९०,३५२,३५ १(२) भारतीय न्याय संहिता (बी एन एस), नुसार वरील सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मच्छिंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भारत बर्डे हे करत आहेत.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात भारतीय संविधानाचा ७५ व्या अमृतमहोत्रावा निमित्त संविधान वाचन पंधरवडाचे उद्घाटन संपन्न.

केज/प्रतिनिधी–स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता.केज जि. बीड येथे भारतीय संविधानाच्या ७५ व्या अमृत महोत्सवा निमित्त संविधान वाचन पंधरवडाचे १४ ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत संविधान वाचन पंधरडाचे उद्घाटन स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, धारूरचे मॅनेजर महेश आनंदगावकर, बँकेचे कर्मचारी, यशवंत कुमार अनपर्ती, मनिष लाल, चैतन्य र. बनसोडे, अनंत तिवारी, शांतनू गोखले, गौरव मडावी,अद्वैत आनंदगांवकर, दादासाहेब गायकवाड, वैरागे एस. के.,रावसाहेब जाधव, नारायण गायकवाड, माजी सरपंच रामराजे गायकवाड, रमेशराव गायकवाड, आरुण गायकवाड, रविंद्र गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, यांच्या उपस्थितीत व ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते, प्राचार्य,डॉ. वसुदेव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन झाले.



या कार्यक्रमाला ग्रंथालयाचे आनंद गायकवाड, कृष्णराजे गायकवाड, शौर्य गायकवाड, कु. विरा सोनवणे, कु. दिव्या साबळे, कु. कल्याणी घोगले,कु. लक्ष्मी चौरे, सेवानिवृत्त मुरकाध्यापक छानाना गायकवाड यांच्यासह विद्यार्थी, युवक, जेष्ठ नागरिक, वाचक, हितचिंतक, ग्रामस्थ यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

यानिमित्ताने भारतीय संविधानाचे वाचन करण्यात आले, ग्रंथवाचनासह ग्रंथप्रदर्शनही घेण्यात आले. १४ ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधी विविध कार्यक्रम व उपक्रम राबवून हा भारतीय संविधान पंधरवडा राबविला जाणार आहे.यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप डॉ.वसुदेव गायकवाड यांनी केला.

कार्यक्रमाचे प्रास्तविक, सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांनी केले.

# राष्ट्रीय ऑर्थोडोंटिक परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी यांच्या रिसर्च पोस्टरला प्रथम पुरस्कार

लातूर,– इंडियन ऑर्थोडोंटिक सोसायटी (खजड) यांच्या वतीने ५९ वी राष्ट्रीय ऑर्थोडोंटिक परिषद नुकतीच विशाखापट्टणम येथे घेण्यात आली. या परिषदेत लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे उप प्रचार्य तथा ऑर्थो डोंटिक तज्ज्ञ प्रा. डॉ. यतिशकुमार जोशी यांनी सादर केलेल्या रिसर्च पोस्टरला प्रथम पुरस्कार मिळाला आहे.



विशाखापट्टणम येथे पार पडलेल्या तीन दिवशीय राष्ट्रीय ऑर्थोडोंटिक परिषदेत डॉ. यतिशकुमार जोशी यांनी परिषदेच्या तिसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात शिक्षक प्रवर्गात 'डीएमआयएमएस सुधारित एईटीकॉम मॉड्यूलद्वारे दंत विद्यार्थ्यांच्या संज्ञानात्मक क्षेत्रात प्रशिक्षणाच्या परिणामाचे मूल्यांकन' या विषयावर रिसर्च पोस्टर सादर केले. या रिसर्च पोस्टर साठी डॉ. जोशी यांना प्रथम पुरस्कार मिळाला असून मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, डॉ. आनंद आंबेकर, डॉ. गणेश डांगे व एम.डी.एस. ऑर्थोडोंटिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी डॉ. दिशा खंदाडे, डॉ. रिया गाला, डॉ. सुमित होनराव, डॉ. गजानन वाघमोडे, डॉ. अनिरुद्र जगताप, डॉ. श्रीकांत श्रृंगारे, डॉ. ऋषभ बागडिया, डॉ. पृथ्वीराज करहाळे, डॉ. अजित सोमवंशी यांनी सहभाग नोंदवला.

या यशाबद्दल डॉ. यतिशकुमार जोशी यांचे एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे यांच्यासह एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील डॉक्टर व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन होत आहे.

# अभियंता नितीन पाटील यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा उत्साहात संपन्न...

लातूर प्रतिनिधी : – अभियंता नितीन पाटील यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित करण्यात आलेला गौरव सोहळा काल अत्यंत उत्साहात व भावनिक वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व औद्योगिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

या प्रसंगी मा. आबासाहेब चव्हाण (बीड राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष अजित पवार गट), परळी पंचायत समिती सभापती गोविंद देशमुख, लातूरचे नामांकित उद्योजक दिलीपजी माने, भाजपा नेते विक्रमकाका शिंदे, अजितराव शिंदे (कासारखेडा), बळवंत काळे (चिकुर्डा), मदनराव काळे, पाटील परिवाराचे निकटवर्तीय गोपाळ शिंदे, प्रकाश फंड, पद्माकर जाधव, अतुल धनंजय देशमुख, शेंद्री येथील रविकिरण राजेनिंबाळकर (व्याही), धाराशिव येथील केशवराव पाटील (सासरे), विक्रमदादा पडवळ, डॉ. डी. के. पाटील, डॉ. दाताळ, अनिल बादाडे यांच्यासह लातूर शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर व पाटील परिवाराचे स्नेही असे सुमारे २५० ते ३०० नागरिक उपस्थित होते. या

कार्यक्रमात परिवारातील कन्या डॉ. भक्ती पाटील हिने केलेल्या भावूक भाषणाने उपस्थितांची मने जिंकली. तिच्या शब्दांतून वडिलांच्या प्रतिचा आदर, कृतज्ञता व अभिमान व्यक्त झाला. यावेळी मुख्य कार्यकारी अभियंता अमर पाटील यांनीही मनोगत व्यक्त करत, नितीन पाटील यांच्या कार्यकुशलतेचा, रोखठोक व प्रामाणिक स्वभावाचा विशेष उल्लेख केला. खेळीमेळीच्या वातावरणात काम करत सर्वांना सोबत घेऊन जाण्याची त्यांची भूमिका उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले.

इतर मान्यवरांनीही आपल्या भाषणातून नितीन पाटील यांच्या मनमोकळ्या, सहकार्यशील स्वभावाबद्दल गौरवोद्गार काढत, त्यांच्या पुढील आयुष्यासाठी मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांनी भोजनाचा आस्वाद घेतला. आनंदी व उत्साही वातावरणात हा सेवानिवृत्ती गौरव सोहळा यशस्वीरित्या पार पडला.

# प्रशासनाने लोकाभिमुख व पारदर्शकपणे कार्य करावे मुख्य सचिव राजेश अग्रवाल

छत्रपती संभाजीनगर (विमाका)–शासनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविताना त्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी प्रशासनाने लोकाभिमुख राहून पारदर्शकपणे कार्य करावे, असे निर्देश मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले.



विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात छत्रपती संभाजीनगर विभागाची आढावा बैठक मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, विभागातील आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत मुख्य सचिवांनी प्रत्येक जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती घेतली. योजनांच्या अंमलबजावणीदरम्यान येणाऱ्या अडचणी तत्काळ दूर करून कामांना गती देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नागरिकांना योजनांची माहिती सहज, सुलभ व स्थानिक भाषेत दिली जावी, तसेच त्यांच्या समस्या समजून घेऊन तातडीने निराकरण करण्यात यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

योजना प्रभावीपणे राबविताना विविध विभागांतील अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय साधून काम करणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत, प्रशासनाबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये सकारात्मकता निर्माण होणे गरजेचे असल्याचे मुख्य सचिव म्हणाले.

शासकीय योजनांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचावा यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे. प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढून सेवा देताना पारदर्शकता, गती महत्वाची आहे असे त्यांनी सांगितले.

बैठकीत महसूल विभागाच्या कामकाजाचा आढावा घेताना जमिनीचे प्रश्न, नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवणाऱ्या बाबी, तसेच शासकीय सेवा अधिक सुलभ व पारदर्शक करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. यासह प्रमुख पायाभूत प्रकल्प, विविध विभागांच्या मंजुरीअभावी प्रलंबित असलेले प्रकल्प, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण), मुख्यमंत्री कृषी सौर योजना, ग्रामीण भागातील उद्योगविकास, तसेच सातबारावरील खरेदी–विक्री व्यवहारांबाबतही मुख्य सचिवांनी सखोल आढावा घेतला.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागात राबविण्यात येत असलेल्या विविध शासकीय योजनांची सद्यस्थिती, अंमलबजावणीतील प्रगती तसेच भविष्यातील नियोजन याबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# इचलकरंजी पाणी पुरवठा व जीएसटी परतावा प्रश्नी लवकरच कार्यवाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

कोल्हापूर, (इचलकरंजी) : महाराष्ट्राचे मिनी मँचेस्टर म्हणून ओळख असलेल्या आणि औद्योगिक कामगार नगरी असलेल्या इचलकरंजी शहराचा सुरळीत पाणीपुरवठा तसेच महानगरपालिकेच्या कोट्यवधीचा जीएसटी परतावा प्रश्नी लवकरच कार्यवाही करणार असल्याचे आश्वासन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. इचलकरंजी शहरात अंदाजित ४३० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांच्या उद्घाटन, भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशिल माने, आमदार डॉ. राहूल आवाडे, आमदार अशोक माने, जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस, इचलकरंजी मनपा आयुक्त पल्लवी पाटील, माजी आमदार प्रकाश आवाडे, माजी आमदार सुरेश हाळवणकर आदी मान्यवर उपस्थित होते.सुमारे ४३० कोटी रुपये खर्च करून इचलकरंजी शहरातील महानगरपालिका क्षेत्रात १० तर ५ ग्रामीण भागात विकासकामे करण्यात येणार आहेत. यामध्ये पंचगंगा प्रदूषण उपाययोजनेअंतर्गत औद्योगिक सांडपाणी प्रक्रियेसाठी (मनपा व एमआयडीसी क्षेत्र) ३६१.३१ कोटी, ग्रामीण भागात (जिल्हा परिषद) ५.७५ कोटी, तर शहरात ६२.७७ कोटी रुपयांची विविध विकासकामे करण्यात येणार आहेत. या विविध विकासकामांचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांनी कळ दाबून (रिमोटद्वारे) केले.

जीएसटी परतावा मिळणार–मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, पुढील पाच वर्षांत जीएसटीच्या परताव्यासंदर्भातील प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून लवकरच जीएसटीचा आवश्यक तो परतावा इचलकरंजीकरांना मिळेल. शहराच्या विकासाकरिता आणि येथील उद्योगांसाठी योग्य ती कार्यवाही करून इचलकरंजी शहराचा चेहरामोहरा बदलू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.'श्री शंभूतीर्थ' पुतळ्याचे लोकार्पण–इचलकरंजी महानगरपालिकेच्या वतीने शहरातील कॉ. के. एल. मलाबादे चौक सुशोभीकरण अंतर्गत उभारण्यात आलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे 'श्री शंभूतीर्थ' म्हणून लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती आणि इचलकरंजी महानगरपालिकेच्यावतीने हा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे.

पुतळ्याच्या अनावरणावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महानगरपालिकेसह येथील नागरिकांनी पुढाकार घेऊन लोकसहभागातून हा पुतळा उभारला आहे. यातील जनसहभाग महत्त्वाचा असून, हे एका अर्थाने जनतेचे स्मारक आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रेरणेने लोकांमध्ये तेज निर्माण होते. महाराजांचा इतिहास देदिप्यमान असून, तो प्रत्येकापर्यंत पोहोचला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या सोहळ्यासाठी संभाजी भिडे गुरुजी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच इतिहासप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तत्पूर्वी इचलकरंजी येथील हेलिपॅडवर आमदार डॉ. राहूल आवाडे, माजी आमदार प्रकाश आवाडे आणि इचलकरंजी महापालिका आयुक्त पल्लवी पाटील यांनी त्यांचे स्वागत केले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर – ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर – ४१३५१२ येथे प्रकाशित केले.